**दिनांक २५/६/२०१८ रोजी राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यालय, आरोग्य भवन, मुंबई येथे संपन्न झालेल्या कु.क.राज्य गुणवत्ता आश्वासन उपसमितीच्या बैठकीचे इतिवृत्त**

.................................................................................................................................

कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया संदर्भात दिनांक २५ जून २०१८ रोजी मा. डॉ. संजीव कुमार, आयुक्त (आरोग्य सेवा) तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचे अध्यक्षतेखाली राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यालय, आरोग्य भवन, मुंबई येथे कु.क. राज्य गुणवत्ता आश्वासन उपसमितीची बैठक दुपारी ३.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील अधिकारी उपस्थित होते.

१) डॉ. संजिव कांबळे, संचालक, आरोग्य सेवा, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२) डॉ. (श्रीमती) अर्चना पाटील, अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा (कुटुंब कल्याण), पुणे
३) डॉ. (श्रीमती) रेखा डावर, माजी अधिष्ठता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अकोला तथा स्त्रीरोग तज्ञ, मुंबई
४) डॉ. (श्रीमती) विनया आंबोरे, सहाय्यक प्राध्यापक (शल्य चिकित्सा विभाग), ग्रँट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर जे.जे. रुग्णालय समुह, मुंबई
५) डॉ. दिगंबर कानगुले, सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा (कुटुंब कल्याण), पुणे

**सदर बैठकीचे विषयपत्रिके वरील विषय खालील प्रमाणे आहेत,**

(१) दि.३१.१०.२०१७ रोजी झालेल्या गुणवत्ता आश्वासन उपसमितीच्या बैठकीचे इतिवृत्त कायम करणे.
(२) कुटुंब नियोजन नुकसान भरपाई योजने अंतर्गत सन २०१७-१८ मधील भौतिक व आर्थिक बाबींचा आढावा घेणे.
(३) सन २०१७-१८ मधील कुटुंब नियोजन शस्त्रक्रिये नंतर मृत्यू पावलेल्या उर्वरित ११ प्रकरणांचा आढावा घेणे.
(४) मा. अध्यक्षांच्या संमतीने ऐनवेळी उपस्थित होणा-या विषयांवर चर्चा करणे.

डॉ. दिगंबर कानगुले, सहाय्यक संचालक आरोग्य सेवा (कु.क.) पुणे यांनी मा. अध्यक्षांचे व सर्व उपस्थित सदस्यांचे स्वागत केले व बैठकीच्या विषयसूचीनुसार सर्व विषयांची माहिती दिली. उपस्थित सदस्यांनी प्रत्येक विषयांस अनुसरुन आपली तांत्रिक व प्रशासकीय बाबींच्या संदर्भात मते मांडली. त्यानुसार काही महत्वाचे धोरणात्मक निर्णय या समितीने घेतले. प्रत्येक विषयानुसार झालेली चर्चा, उपस्थित केलेले मुद्दे व झालेले निर्णय या विषयाचा कार्यवृत्तांत खालीलप्रमाणे आहे,

- दि. ३१.१०.२०१७ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.

**सदर बैठकीमध्ये खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले,**

- कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करण्यापूर्वी Pre Existing Medical History ची नोंद काळजीपूर्वक घेण्याबाबत व त्याबाबतची सर्व कागदपत्रे मृत्यू प्रकरणाच्या प्रस्तावास जोडण्याबाबत सर्व जिल्हे/मनपा यांना सुचना निर्गमीत कराव्यात.
- सन २०१७-१८ या आर्थिक वर्षामध्ये कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया शिबीरामध्ये केल्या गेलेल्या शस्त्रक्रियेनंतर किती असफल, गुंतागुंत व मृत्यू प्रकरणे आहेत याबाबतची सविस्तर माहिती समितीस पुढील बैठकीत सादर करावी.
- सन २०१७-१८ या आर्थिक वर्षामधील कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेनंतर मृत्यू पावलेल्या ११ मृत्यूंचे अन्वेषण व चर्चा या सभेमध्ये करण्यांत आली. डॉ. दिगंबर कानगुले, सहाय्यक संचालक, कु.क. यांनी सर्व ११ मृत्यु प्रकरणे एक एक करुन संक्षिप्त स्वरुपात समितीसमोर मांडली. त्यानुसार समितीतील तज्ञांनी सदर ११ मृत्यू बाबत आपले विचार मांडले.



Scanned by CamScanner

- डॉ. (श्रीमती) रेखा डावर, माजी अधिष्ठता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अकोला तथा स्त्रीरोग तज्ञ, मुंबई यांनी काही प्रकरणामध्ये शस्त्रक्रियेपूर्वीच्या तपासणीमधील त्रुटी, शस्त्रक्रिया करतेवेळी झालेले दुर्लक्ष, पाठपुरावा करतेवेळी न घेतलेली काळजी इ. छोटया त्रुटींमुळे मृत्यू झाल्याचे समितीच्या निदर्शनास आणुन दिले. तसेच मृत्यू प्रकरणांबाबत संक्षिप्त स्वरुपात माहिती सादर करतांना प्रत्येक प्रकरणातील मृत्यू पावलेल्या महिलेचा विस्तृत बायोडाटा, आजाराचा पुर्व इतिहास असल्यास त्याची नोंद, विविध प्रयोगशाळा चाचण्यांचे अहवाल व मृत्यूचे कारण नमुद करण्याबाबत सुचविले.
- डॉ. (श्रीमती) रेखा डावर, यांनी मृत्यू प्रकरणाबाबत माहिती राज्य कुटुंब कल्याण कार्यालय पुणे येथे राज्य स्तरावर प्राप्त झाल्यानंतर पुणे येथे जिल्हा रुग्णालयात अथवा ससुन रुग्णालयात कार्यरत असलेल्या स्त्रीरोग तज्ञामार्फत सर्व केस पेपर्स तपासुन मृत्यूचे नेमके कारण निश्चित करावे असे सुचित केले.
- डॉ. संजीव कांबळे, संचालक, आरोग्य सेवा महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी सर्व मृत्यू प्रकरणांच्या वैद्यकीय उपचाराचे सर्व केस पेपर्स उपलब्ध करुन घेऊन समिती बैठकीमध्ये चर्चेसाठी सादर करण्याबाबत सुचित केले.
- सन २०१७-१८ या आर्थिक वर्षामधील आज चर्चा केलेल्या सर्व ११ मृत्यू प्रकरणांच्या वैद्यकीय उपचाराबाबतचे सर्व केस पेपर्स डॉ. (श्रीमती) रेखा डावर, यांना निरीक्षणासाठी पाठवावेत. डॉ. (श्रीमती) रेखा डावर, यांनी या सर्व ११ मृत्यू प्रकरणांबाबत वैद्यकीय उपचारासंदर्भातील केस पेपर्सच्या आधारे आपले अभिप्राय द्यावेत व त्यानुसार या ११ प्रकरणाबाबत पुढील बैठकीमध्ये चर्चा करावी असे मा. आयुक्त (आरोग्य सेवा) तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांनी सुचित केले.

| Sr. No. | Name of Deceased | Date of Operation & Date of Death | Type of Operation | Remark of State Quality Assurance Sub Committee |
|---|---|---|---|---|
| 1 | Smt. Sangita Thakare | 07-10-17<br>14-10-17 | Minilap | • Collect details of medical treatment given & send copy of it to Dr. Rekha Dawar madam for remarks. |
| 2 | Smt. Gouri Gaikwad | 15-12-18<br>30-01-18 | Minilap | • Hospital should strictly follow guidelines for preoperative, consent, check list , intra operative, post operative monitoring<br>• Collect details of medical treatment given & send copy of it to Dr. Rekha Dawar madam for remarks. |
| 3 | Smt. Chetana Shende | 25-11-17<br>06-12-17 | LSCS with TL | • Hospital should strictly follow guidelines for preoperative, consent, check list , intra operative, post operative monitoring<br>• Collect details of medical treatment given & send copy of it to Dr. Rekha Dawar madam for remarks. |
| 4 | Smt. Mukta Khagewad | 02-02-18<br>03-02-18 | Laparoscopy | • Careful preoperative examination by Medical Officer<br>• Availability of emergency drugs<br>• Collect details of medical treatment given & send copy of it to Dr. Rekha Dawar madam for remarks. |



Scanned by CamScanner

| अ. क्र. | विषय | करावयाची कार्यवाही व अपेक्षित कालावधी | जबाबदार अधिकारी |
|---|---|---|---|
| १ | कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करण्यापूर्वी Pre Existing Medical History काळजीपूर्वक घेण्यात यावी व त्याचे कागदपत्रे मृत्यू प्रकरणाच्या प्रस्तावास जोडावेत. | कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करण्यापूर्वी Pre Existing Medical History काळजीपूर्वक घेण्याबाबत व त्याबाबतची सर्व कागदपत्रे मृत्यू प्रकरणाच्या प्रस्तावास जोडण्याबाबत सर्व जिल्हे/मनपा यांना परिपत्रकाव्दारे सुचना निर्गमीत निर्गमित करणे. | डॉ.डी.टी.कानगुले, सहाय्यक संचालक (कु.क.), पुणे |
| २ | सन २०१७-१८ मध्ये कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया शिबीरामध्ये केल्या गेलेल्या शस्त्रक्रियेनंतर किती प्रकरणे असफल, गुंतागुंत व मृत्यू ची आहेत याबाबतची माहिती समितीस सादर करणे. | सन २०१७-१८ मध्ये कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेनंतर असफल, गुंतागुंत व मृत्यू झालेल्या प्रकरणांची माहिती समितीस सादर करणे | डॉ.डी.टी.कानगुले, सहाय्यक संचालक (कु.क.), पुणे |
| ३ | मृत्यू प्रकरणाबाबतची माहिती राज्य स्तरावर प्राप्त झाल्यानंतर पुणे येथे जिल्हा रुग्णालयात अथवा ससुन रुग्णालयात कार्यरत असलेल्या स्त्रीरोग तज्ञामार्फत सर्व केस पेपर्स तपासुन मृत्यूचे नेमके कारण निश्चित करावे व नंतरच समितीसमोर सादर करणे. | मृत्यू प्रकरणाबाबत प्राप्त माहितीच्या आधारे तज्ञामार्फत मृत्यूचे कारण निश्चित करणे. | डॉ.डी.टी.कानगुले, सहाय्यक संचालक (कु.क.), पुणे |
| ४ | सन २०१७-१८ मध्ये झालेल्या ११ मृत्यू प्रकरणांबाबत सर्व केसपेपर्स डॉ. (श्रीमती) रेखा डावर, माजी अधिष्ठता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अकोला तथा स्त्रीरोग तज्ञ, मुंबई यांना निरीक्षणासाठी पाठवून त्यांचे अभिप्राय घ्यावेत व त्यानुसार मार्गदर्शक सूचना सर्व जिल्हे/मनपा यांना निर्गमित करणे | डॉ. (श्रीमती) रेखा डावर, यांच्या अभिप्रायानुसार मार्गदर्शक सूचना सर्व जिल्हे/मनपा यांना निर्गमित कराव्यात. | डॉ.डी.टी.कानगुले, सहाय्यक संचालक (कु.क.), पुणे. (डॉ. श्रीमती रेखा डावर यांच्या सहाय्याने) |

डॉ. दिगंबर कानगुले, सहाय्यक संचालक (कु.क.) पुणे यांनी सर्व उपस्थित सदस्यांचे आभार मानले व अध्यक्षांच्या परवानगीने बैठक समाप्त झाल्याचे घोषीत केले.

**सदस्य सचिव**
**तथा**
**अतिरिक्त संचालक आरोग्य सेवा**
**कु.क., मा.बा.सं. व शा.आ. पुणे**

**अध्यक्ष**
**तथा**
**आयुक्त (आरोग्य सेवा) व**
**अभियान संचालक, रा.आ.अ., मुंबई**

Scanned by CamScanner

**दिनांक २७/२/२०१९ रोजी राष्ट्रीय आरोग्य अभियान कक्ष, आरोग्य भवन, मुंबई येथे आयोजीत केलेल्या राज्य गुणवत्ता आश्वासन उपसमितीच्या बैठकीचे इतिवृत्त**

.....................................................................................................

कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया संदर्भात दिनांक २७ फेब्रुवारी २०१९ रोजी मा. डॉ. अनुप कुमार यादव, आयुक्त (आरोग्य सेवा) तथा संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचे अध्यक्षतेखाली तीसरा मजला, आरोग्य भवन, मुंबई येथे राज्य गुणवत्ता आश्वासन उपसमितीची बैठक दुपारी ४.३० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील अधिकारी उपस्थित होते.

१) डॉ (श्रीमती) अर्चना पाटील, अतिरिक्त संचालक (कुटुंब कल्याण) पुणे
२) डॉ. (श्रीमती) रेखा डावर, माजी स्त्रीरोग तज्ञ, जे.जे. रुग्णालय, मुंबई
३) डॉ. (श्रीमती) विनया आंबोरे, सहाय्यक प्राध्यापक (शस्त्रक्रिया विभाग), जे.जे. रुग्णालय, मुंबई
४) डॉ. डी.टी. कानगुले, सहाय्यक संचालक (कुटुंब कल्याण) पुणे

सदर बैठकीचे विषय पत्रिके वरील विषय खालील प्रमाणे होते.

(१) दि. २५.६.२०१८ रोजी झालेल्या गुणवत्ता आश्वासन उपसमितीच्या सभेचे इतिवृत्त कायम करणे.
(२) कुटुंब नियोजन नुकसान भरपाई योजने अंतर्गत सन २०१८-१९ मधील भौतिक व आर्थिक बाबींचा आढावा घेणे.
(३) सन २०१७-१८ व २०१८-१९ मधील कुटुंब नियोजन शस्त्रक्रिये नंतर झालेल्या मृत्यू प्रकरणांचा आढावा घेणे.
(४) मा. अध्यक्षांच्या संमतीने ऐन वेळी उपस्थित होणा-या विषयांवर चर्चा करणे.

डॉ. दिगंबर कानगुले, सहाय्यक संचालक आरोग्य सेवा (कु.क.) पुणे यांनी मा. अध्यक्षांचे व सर्व उपस्थित सदस्यांचे स्वागत केले. या सभेतील विषय सूचीनुसार विषयांची माहिती दिली. उपस्थित सदस्यांनी प्रत्येक विषयांस अनुसरुन आपली तांत्रिक व प्रशासकीय बाबीच्या संदर्भात मते मांडली. त्यानुसार काही महत्वाचे धोरणात्मक निर्णय या समितीने घेतले. प्रत्येक विषयानुसार झालेली चर्चा, उपस्थित केलेले मुद्दे व झालेले निर्णय या विषयांचा कार्यवृत्तांत खालीलप्रमाणे -

- दि. २५.०६.२०१८ रोजीच्या बैठकीचे ईतिवृत्त वाचून कायम करण्यांत आले.
- सन २०१७-१८ या आर्थिक वर्षामधील कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेनंतर झालेल्या उर्वरित ११ मृत्यूंबाबत बैठकीमध्ये चर्चा करण्यांत आली. तज्ञांनी सर्व मृत्यू प्रकरणांचे पृथःकरण केले. यामध्ये शस्त्रक्रियापूर्वीची तपासणीमधील त्रुटी, शस्त्रक्रिया करतेवेळी झालेले दुर्लक्ष, पाठपुरावा करतेवेळी न घेतलेली काळजी इ. त्रुटींचे विश्लेषण केले.

सदर बैठकीमध्ये काही मुदयांवर सखोलपणे चर्चा करण्यांत आली, याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे

- केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार तसेच शासन निर्णय दि. १८.७.१६ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेनंतर झालेले मृत्यू, असफल व गुंतागुंत प्रकरणांबाबत दाव्यांचे अर्ज निकाली काढण्याची कार्यवाही विहित वेळेत पूर्ण करणे आवश्यक आहे. यास्तव लाभार्थ्याने दाव्याचा अर्ज संबंधित आरोग्य संस्थेमार्फत परिपूर्ण भरुन पुढील कार्यवाहीसाठी संबंधित जिल्हयांचे जिल्हा आरोग्य अधिकारी तथा नोडल अधिकारी यांच्याकडे घटना घडल्यापासून ९० दिवसांच्या आत सादर करणे अपेक्षित आहे.

  सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई शासन निर्णय क्र. कुनियो-२०१३/प्रक्र ७४/कु.क. दि. ९.५.२०१३ अन्वये ६० दिवसांपेक्षा जास्त कालावधीकरीता प्रलंबित असणा-या दाव्यांची प्रकरणे निकाली काढण्यासाठी राज्य स्तरावरावर बैठक आयोजित करण्याबाबत नमूद केले होते. तथापि,



Scanned by CamScanner

केंद्र शासनाची मार्गदर्शक पुस्तिका नोव्हेंबर २०१४ व मार्च २०१६ तसेच शासन निर्णय दि. १८.७.१६ अन्वये ९० दिवसांपेक्षा उशीराने प्राप्त होणारे प्रस्ताव राज्य स्तरावरावर निकाली काढण्यासाठी बैठक आयोजित करणेबाबत सूचना देण्यात आलेल्या नाहीत.

केंद्र शासनाच्या दि. १५.२.२०१९ रोजी नागपूर येथे कुटुंब कल्याण कार्यक्रमांतर्गत झालेल्या कार्यशाळेमध्ये आरोग्य संस्थेमध्ये कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेनंतर असफल/गुंतागुंत प्रकरण किंवा मृत्यू झाल्याचे निदर्शनांस आल्यानंतर प्रस्ताव घटना घडल्यापासून प्रस्ताव ९० दिवसांच्या आत जिल्हा स्तरावर प्राप्त होऊन विहित वेळेत कार्यवाही पूर्ण करणे आवश्यक असून ९० दिवसांपेक्षा उशिराने प्राप्त होणा-या प्रस्तावांचा राज्य स्तरावर मान्यतेसाठी घेण्यात येऊ नयेत अश्या सूचना दिलेल्या आहेत. त्यानुसार माहे एप्रिल २०१९ पासून ९० दिवसांच्या पेक्षा उशिराने प्राप्त होणारे प्रस्ताव राज्य स्तरावर मान्यतेसाठी सादर करण्यात येऊ नयेत अश्या सूचना सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद यांना परिपत्रकान्वये कळविण्यात याव्यात असा निर्णय झाला.

- सन २०१३-१४ ते सन २०१८-१९ मधील प्रलंबित प्रकरणांची अद्यावत माहिती तात्काळ पाठविणेबाबत सर्व संबंधित जिल्हयांना/मनपा यांना कळविण्यात यावे असा निर्णय घेण्यात आला.
- कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेनंतर झालेल्या मृत्यू प्रकरणांबाबत सुधारित फॉर्मेट मध्ये सिझेरियन प्रसूती दरम्यान कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया झालेली असल्यास त्याचे Indication स्पष्ट नमूद करावेत. तसेच सदर फॉर्मेट मध्ये Intra Operative Notes & High Risk Factor नमूद करावेत.
- श्रीमती. निलम राऊळ, सिंधुदुर्ग या मृत्यू प्रकरणामध्ये महिलेस शस्त्रक्रियेपूर्वी गरम इनिमा दिलेल्या असल्याचे निर्देशनास आले आहे. यास्तव भविष्यात अशी घटना घडू नये यासाठी रुग्णास इनिमा देण्यात येऊ नयेत याबाबतच्या सूचना सर्व जिल्हयांना परिपत्रकान्वये कळविण्यात यावे असा निर्णय घेण्यात आला.
- राज्यातील कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया करणा-या व याकरीता प्रशिक्षीत असलेल्या वैद्यकीय अधिकारी यांचे प्रशिक्षण आयोजित करुन त्यामध्ये कुटुंब नियोजन शस्त्रक्रिये संबंधी असलेल्या सर्व मार्गदर्शक सूचनांचे व शासन निर्णयांचा एक संच तयार करुन देण्यात यावा असा ही निर्णय घेण्यात आला.

डॉ. दिगंबर कानगुले, सहाय्यक संचालक (कु.क.) पुणे यांनी सर्व उपस्थित सदस्यांचे आभार मानले व अध्यक्षांच्या मान्यतेने बैठक समाप्त झाल्याचे घोषित केले.

**सदस्य सचिव तथा**
**अतिरिक्त संचालक आरोग्य सेवा**
**कुटुंब कल्याण, मा.बा.सं. व शा.आ. पुणे**

**अध्यक्ष तथा**
**आयुक्त (आरोग्य सेवा) तथा**
**अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई**

Scanned by CamScanner